**स्व.भैय्यासाहेब उपाख्य दिलीपराव काळे यांच्या स्मृतिला समर्पित वाचन संस्कृतीला प्रोत्साहित करण्यासाठी "वाचते व्हा" 'या उपक्रमांतर्गत लेखी परीक्षेचे आयोजन**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी येथील ग्रंथालय विभागाद्वारे आयोजित व स्व.दिलीपराव उपाख्य भैयासाहेब काळे स्मृति मंच,आर्वी द्वारा प्रेरीत **'वाचते व्हा'** या उपक्रमा अंतर्गत वाचन चळवळीचा उद्घाटन सोहळा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी येथे दि. २२/१२/२०२५ रोजी संपन्न झाला. या उपक्रमांतर्गत २०२५-२६ या सत्रासाठी साहित्यिक श्रीमती सुधा मुर्ती यांच्या पुण्यभूमी भारत, गोष्टी माणसांच्या व आजीच्या पोतडीतील गोष्टी या पुस्तकावर लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली होती.

या उपक्रमाच्या उद्घाटन  कार्यक्रमाचे अध्यक्ष भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्था आर्वीच्या अध्यक्षा ॲड. शोभाताई काळे, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. हेमंत खडके, सुप्रसिद्ध वक्ते व सेवानिवृत्त प्राध्यापक, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती हे उपस्थित होते. सोबतच प्रमुख अतिथी म्हणून लोकसत्ता, वर्धा चे पत्रकार श्री. प्रशांत देशमुख तसेच श्रीमती निर्मलाताई हिवसे, माजी मुख्याध्यापक मॉडेल हायस्कूल नांदपूर आणि कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र सोनटक्के हे उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शक डॉ.हेमंत खडके यांनी आजच्या मोबाईलच्या युगात विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रवृत्त केल्याबद्दल संस्थेच्या या उपक्रमाची स्तुती केली. सोबतच विद्यार्थ्यांकरिता वेगवेगळ्या कवींच्या कविता सादर करून विद्यार्थ्यांना त्यातील सौंदर्य उलगडून दाखविले. आणि साहित्यिक श्रीमती सुधा मूर्ती यांच्या साहित्याचा परिचय करून दिला. भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्था आर्वीच्या अध्यक्षा ॲड.शोभाताई काळे यांनी ॲड. स्व.भैयासाहेब काळे यांच्या व्यासंगी वाचनाबद्दल विवेचन करून त्यांच्या पुस्तकाच्या आवडीबद्द्ल सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात  पुस्तकांची महत्वाची भूमिका  त्यांनी विद्यार्थ्यांपुढे विषद केली त्यातून विद्यार्थ्यांनी कशाप्रकारे प्रेरणा घ्यावी हे सांगितले. प्रमुख अतिथी श्री.प्रशांत देशमुख यांनी त्यांच्या भाषणातून विविध पुस्तकाच्या वाचनातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन देशहितासाठी कार्य करावे असे सांगितले.

लेखी परीक्षेसाठी भारत व कृषक शिक्षण संस्थेशी संलग्नित सर्व शाळा व महाविद्यालयातील २७५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आर्वी, कृषक कन्या विद्यालय, आर्वी व कृषक मराठी शाळा या परिक्षा केंद्रावर १९६२ विद्यार्थी, तर मॉडेल हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय, कारंजा(घा) येथे ७८९ विद्यार्थी या  परीक्षेसाठी  हजर होते. परीक्षेकरिता त्या शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेतर्फे साहित्यिक श्रीमती सुधा मुर्ती यांच्या पुण्यभूमी भारत, गोष्टी माणसांच्या, आजीच्या पोतडीतील गोष्टी ही पुस्तके उपलब्ध करून देण्यात आले होती. त्यातून विद्यार्थ्यांचे ज्ञानवृद्धींगत व्हावे व विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी हा उद्देश या smile, उपक्रमाचा आहे. कार्यक्रमाचे संचालन प्रा.दर्शनकुमार चांभारे यांनी, प्रास्ताविक प्राचार्य डॉ.रविंद्र सोनटक्के यांनी तर आभार प्रदर्शन ग्रंथपाल डॉ.मनीषा खाकरे यांनी केले. याप्रसंगी संस्थेअतंर्गत येणाऱ्या सर्व शाळा, महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षिका निमंत्रित मान्यवर व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

या परीक्षेच्या निमित्ताने का होईना साहित्यिक श्रीमती सुधा मुर्ती यांची ही पुस्तक वाचली, त्यामुळे आम्हाला वाचनाची आवड लागली. अशा प्रकारच्या परीक्षा दरवर्षी झाल्यास आमचे वाचन वाढेल अशा बोलक्या प्रतिक्रिया

यावेळी चिमुकल्या ग्रंथालयातर्फे वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी उपक्रमांतर्गत अश्या प्रकारचे उपक्रम आयोजित केल्या जातात.







'वाचते व्हा'
व
लेखी परीक्षा
साहित्यिक : श्रीमती सुधा मूर्ती
आयोजक : कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी


'वाचते व्हा'
लेखी परीक्षा


वाचन चळवळीचा उद्घाटन सोहळा
'वाचते व्हा'
व
लेखी परीक्षा
साहित्यिक : श्रीमती सुधा मूर्ती
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी



# २७५० विद्यार्थ्यांनी पुस्तकावर दिली परीक्षा

## भैय्यासाहेब काळे स्मृती मंचाचा पुढाकार; साहित्यिक सुधा मूर्ती यांच्या पुस्तकाचे वाचन

शैक्षणिक

▸ आर्वी, (ता. प्र.). भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्थाद्वारा प्रेरित स्व. दिलीप उपाख्य भैय्यासाहेब काळे स्मृती मंचातर्फे 'वाचते व्हा' या उपक्रमांतर्गत वाचन चळवळीचा उद्घाटन सोहळा व लेखी परीक्षा सन २०२५-२६ चे वाचनीय साहित्यिक सुधा मूर्ती यांच्या पुण्यभूमी भारत, गोष्टी माणसांच्या, आजीच्या पोतडीतील गोष्टी या पुस्तकावर आयोजित करण्यात आली होती. यावेळी २७५० विद्यार्थ्यांनी सुधा मूर्ती यांच्या पुस्तकावर आधारित परीक्षा दिली.

उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्थाध्यक्ष ॲड. शोभा काळे होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध वक्ते,



सेवानिवृत्त प्रा. डॉ. हेमंत खडके, प्रमुख अतिथी म्हणून प्रशांत देशमुख, नांदपूर मॉडेल हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक निर्मला हिवसे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र सोनटक्के उपस्थित होते.

यावेळी प्रा. डॉ. खडके यांनी आजच्या मोबाइलच्या युगात विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रवृत्त केल्याबद्दल संस्थेचे आभार मानून या उपक्रमाची स्तुती केली. सोबतच विद्यार्थ्यांकरिता वेगवेगळ्या कविता सादर करून विद्यार्थ्यांना सुधा मूर्ती यांच्या साहित्याचा परिचय करून दिला. ॲड. शोभा काळे यांनी ॲड. स्व. भैय्यासाहेब काळे यांच्या व्यासंगी वाचनाबद्दल विवेचन करून त्यांच्या पुस्तकाच्या आवडीबद्दल सांगितले. विविध विषयांची पुस्तके वाचून त्यावर चर्चा करायला भैय्यासाहेबांना आवडत होते. सोबतच आजच्या विद्यार्थ्यांना त्यातून कशाप्रकारे प्रेरणा घ्यायला पाहिजे हे सांगितले. देशमुख यांनी विविध पुस्तकांच्या वाचनातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन देशहितासाठी कार्य करायला पाहिजे असे सांगितले. संचालन प्रा. दर्शनकुमार चांभारे यांनी, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सोनटक्के यांनी केले. आभार डॉ. मनीषा खाकरे यांनी मानले. याप्रसंगी संस्थेअंतर्गत येणाऱ्या सर्व शाळा, महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षिका व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेच्या निमित्ताने का होईना साहित्यिक सुधा मूर्ती यांची ही पुस्तक वाचली, त्यामुळे आम्हाला वाचनाची आवड लागली. अशा परीक्षा दरवर्षी झाल्यास आमचे वाचन वाढेल, अशा प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी दिल्या.

### विद्यार्थ्यांना शाळेतर्फे पुस्तके केली उपलब्ध

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी, कृषक कन्या विद्यालय, आर्वी व कृषक मराठी शाळा या परीक्षा केंद्रावर १९६२ विद्यार्थी, तर मॉडेल हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय, कारंजा(घा) येथे ७८९ विद्यार्थी असे एकूण २७५० विद्यार्थी परीक्षेसाठी हजर होते. परीक्षेकरिता त्या शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेतर्फे साहित्यिक सुधा मूर्ती यांच्या पुण्यभूमी भारत, गोष्टी माणसांच्या, आजीच्या पोतडीतील गोष्टी ही पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यातून विद्यार्थ्यांचे ज्ञान वृद्धिंगत व्हावे व विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी हा उद्देश या उपक्रमाचा आहे.

# २७५० विद्यार्थ्यांनी एका वेळेस दिली स्व भैय्यासाहेब उपाख्य दिलीप काळे स्मृती मंच द्वारा आयोजित परीक्षा

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

आर्वी, , दि. २२

भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्था, आर्वी, जि. वर्धा द्वारा प्रेरित स्व. दिलीपराव उपाख्य भैयासाहेब काळे स्मृति मंच, आर्वी द्वारा 'वाचते व्हा' या उपक्रमा अंतर्गत वाचन चळवळीचा उद्घाटन सोहळा व लेखी परीक्षा सन २०२५-२६ चे वाचनीय साहित्यिक श्रीमती सुधा मुर्ती यांच्या पुण्यभूमी भारत, गोष्टी माणसांच्या, आजीच्या पोथडीतील गोष्टी या पुस्तकावर आयोजित करण्यात आली होती.

या उपक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्था आर्वीच्या अध्यक्ष ॲड. शोभाताई काळे, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध वक्ते, सेवानिवृत्त प्राध्यापक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती डॉ.हेमंत खडके उपस्थित होते. सोबतच



प्रमुख अतिथी म्हणून लोकसत्ता वर्धा चे पत्रकार श्री.प्रशांत देशमुख, श्रीमती निर्मलाताई हिवसे, माजी मुख्याध्यापक मॉडेल हायस्कूल नोंदपूर, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रविंद्र सोनटक्के उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शक डॉ.हेमंत खडके यांनी आजच्या मोबाईलच्या युगात विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रवृत्त केल्याबद्दल संस्थेचे आभार मानून या उपक्रमाची स्तुती केली. सोबतच विद्यार्थ्यांकरिता वेगवेगळ्या कविता सादर करून विद्यार्थ्यांना श्रीमती सुधा मुर्ती यांच्या साहित्याचा परिचय करून दिला. भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्था आर्वीच्या अध्यक्ष ॲड. शोभाताई काळे यांनी ॲड.स्व.भैयासाहेब काळे यांच्या व्यासंगी वाचनाबद्दल विवेचन करून त्यांच्या पुस्तकाच्या आवडीबद्दल सांगितले. विविध विषयांचे पुस्तके वाचून त्यावर चर्चा करायला ॲड.स्व.भैयासाहेबांना आवडत होते. सोबतच आजच्या विद्यार्थ्यांना त्यातून कशाप्रकारे प्रेरणा घ्यायला पाहिजे हे सांगितले. प्रमुख अतिथी प्रशांत देशमुख यांनी विविध पुस्तकाच्या वाचनातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन देशहितासाठी कार्य करायला पाहिजे असे सांगितले.

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी, कृषक कन्या विद्यालय, आर्वी व कृषक मराठी शाळा या परिक्षा केंद्रावर १९६२ विद्यार्थी, तर मॉडेल हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय, कारंजा(घा) येथे ७८९ विद्यार्थी असे एकूण २७५० विद्यार्थी परिक्षेसाठी हजर होते. परिक्षेकरिता त्या शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेतर्फे साहित्यिक श्रीमती सुधा मुर्ती यांच्या पुण्यभूमी भारत, गोष्टी माणसांच्या, आजीच्या पोथडीतील गोष्टी ही पुस्तके उपलब्ध करून देण्यात आले होती. त्यातून विद्यार्थ्यांचे ज्ञानवृद्धींगत व्हावे व विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी हा उद्देश या उपक्रमाचा आहे. संचालन प्रा.दर्शनकुमार चांभारे यांनी, प्रास्ताविक प्राचार्य डॉ.रविंद्र सोनटक्के यांनी तर आभार डॉ.मनीषा खाकरे यांनी मानले. याप्रसंगी संस्थेअंतर्गत येणाऱ्या सर्व शाळा, महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षिका व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

या परिक्षेच्या निमित्ताने का होईना साहित्यिक श्रीमती सुधा मुर्ती यांची ही पुस्तक वाचली, त्यामुळे आम्हाला वाचनाची आवड लागली. अशा प्रकारच्या परीक्षा दरवर्षी झाल्यास आमचे वाचन वाढेल अशा बोलक्या प्रतिक्रिया यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी दिल्या.

# लोकसत्ता

# 'वाचते व्हा' उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद

## एकाचवेळी २७०० विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा




**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वर्धा :** मुलांमध्ये वाचन संस्काराचे बिजारोपण व्हावे म्हणून राबविण्यात येत असलेल्या 'वाचते व्हा' उपक्रमास लाभलेला प्रतिसाद आशा उंचावणारा ठरला.

भैय्यासाहेब काळे स्मृती मंचतर्फे या उपक्रमाचे आयोजन आर्वी कला वाणिज्य महाविद्यालयात करण्यात आले होते. संस्थाध्यक्ष दिवं. काळे यांचा वाचन व्यासंग अफाट असले.

संस्थाध्यक्ष ॲड. शोभा काळे उद्घाटनप्रसंगी म्हणाल्या, विद्यार्थ्यांचे ज्ञान वृद्धिंगत करणे व त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण करण्याचा हेतू यामागे आहे. प्रमुख वक्ते व समुपदेशक प्रा. डॉ. हेमंत खडके यांनी मोबाइलच्या युगात वाचन कमी होत चालले असल्याबद्दल खंत व्यक्त करीत विद्यार्थीदशेत वाचन गोडी निर्माण करण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तसेच



होता. विद्यार्थ्यांनी पण वाचनातून व्यक्तिमत्त्व घडवावे, यासाठी त्यांनी संस्थेची सर्व शाळा, महाविद्यालये ग्रंथांनी समृद्ध केली. त्यांच्याच स्मृतीत आयोजित हा उपक्रम असल्याचे प्राचार्य डॉ. रवींद्र सोनटक्के यांनी नमूद केले.

उपक्रमात एका लेखकाची पुस्तके विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी दिल्या जातात. त्यावर आधारित एकाचवेळी परीक्षा घेतल्या जाते. यावर्षी लेखिका सुधा मूर्ती यांची पुण्यभूमी भारत, गोष्टी माणसांच्या व आजीच्या पोतडीतील गोष्टी ही पुस्तके वाचन व त्यावर आधारित परीक्षेसाठी देण्यात आली. तीन वयोगटातून झालेल्या या परीक्षेत आर्वीत १ हजार ९६२ व कारंजा केंद्रातून ७८९ विद्यार्थी परीक्षेस वाचनातून घडलेल्या थोर पुरुषांचे दाखले विद्यार्थ्यांपुढे मांडले.

याकेळी माजी मुख्याध्यापक निर्मलाताई हिवसे व पत्रकार प्रशांत देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विशेष कार्यक्रमात पुरस्कार दिल्या जाणार असल्याचे प्रा. दर्शनकुमार थांभारे यांनी सांगितले. डॉ. मनिषा खाकरे यांनी आभार मानले.

याप्रसंगी सुधा मूर्ती यांच्या पुस्तकातील सुभाषितवजा वाक्यांचे फलके सर्वत्र लावून उपक्रमस्थळ लक्षवेधी करण्यात आले होते. सहभागी चिमुकल्या मुलांनी हाती वाचन संदेश देणारे फलक उंचावून लक्ष वेधून घेतले. वाचनप्रेमी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

तरुण भारत
Paschim Vidarbha | 2025-12-26 | Page 13
epaper.tarunbharat.net

# २,७५० विद्यार्थ्यांनी एकाचवेळी दिली परीक्षा

## भय्यासाहेब उपाख्य दिलीपराव काळे स्मृती मंचचे आयोजन

♦ आर्वी, २५ डिसेंबर

भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्था, आर्वीच्या द्वारा प्रेरित स्व. दिलीपराव उपाख्य भय्यासाहेब काळे स्मृती मंचच्या वतीने 'वाचते व्हा' या उपक्रमांतर्गत वाचन चळवळीचा उद्घाटन सोहळा व लेखी परीक्षा २०२५-२६ चे वाचनीय साहित्यिक श्रीमती सुधा मूर्ती यांच्या पुण्यभूमी भारत, गोष्टी माणसांच्या, आजीच्या पोतडीतील गोष्टी या पुस्तकावर आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेत २,७५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत एकाचवेळी परीक्षा दिली.




मार्गदर्शन करताना डॉ. हेमंत खडके, व्यासपीठावर ॲड. शोभा काळे, पत्रकार देशमुख, निर्मला हिवसे, प्राचार्य डॉ. रवींद्र सोनटक्के

या उपक्रमाचे उद्घाटन भारत शिक्षण संस्था व कृषक शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष ॲड. शोभा काळे यांच्या हस्ते झाले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध वक्ते, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. हेमंत खडके, प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार प्रशांत देशमुख, निर्मला हिवसे, प्राचार्य डॉ. रवींद्र सोनटक्के उपस्थित होते.

यावेळी डॉ. हेमंत खडके यांनी आजच्या मोबाईलच्या युगात विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रवृत्त केल्याबद्दल संस्थेचे आभार मानून या उपक्रमाची स्तुती केली. सोबतच विद्यार्थीकालीन वेगवेगळ्या कविता सादर करून विद्यार्थ्यांना सुधा मूर्ती यांच्या साहित्याचा परिचय करून दिला. ॲड. शोभा काळे यांनी स्व. भय्यासाहेब काळे यांच्या वाचनाबद्दल विवेचन करून त्यांच्या पुस्तकाच्या आवडीबद्दल सांगितले. विविध विषयांचे पुस्तके वाचून त्यावर चर्चा करणे भय्यासाहेबांना आवडत होते. सोबतच आजच्या विद्यार्थ्यांना त्यातून कशाप्रकारे प्रेरणा घ्यायला पाहिजे हे सांगितले. प्रशांत देशमुख यांनी विविध पुस्तकांच्या वाचनातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन देशहितासाठी कार्य करायला पाहिजे, असे सांगितले.

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आर्वी, कृषक कन्या विद्यालय आर्वी व कृषक मराठी शाळा या परीक्षा केंद्रावर १९६२ विद्यार्थी, तर मॉडेल हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय, कारंजा (घा.) येथे ७८९ असे २,७५० विद्यार्थी परीक्षेसाठी हजर होते. परीक्षेकरिता विद्यार्थ्यांना साहित्यिक सुधा मूर्ती यांच्या पुण्यभूमी भारत, गोष्टी माणसांच्या, आजीच्या पोतडीतील गोष्टी ही पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यातून विद्यार्थ्यांचे ज्ञानवृद्धीगत व्हावे व विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी, हा उद्देश या उपक्रमाचा होता.

संचालन प्रा. दर्शनकुमार थांभारे, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. रवींद्र सोनटक्के यांनी तर आभार डॉ. मनीषा खाकरे यांनी मानले. यावेळी संस्थेअंतर्गत येणाऱ्या सर्व शाळा, महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षिका व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

♦(तभा वृत्तसेवा)

# समर्थ लहानुजी महाराज पुण्यतिथी महोत्सव आजपासून

**वर्धा :** येथील संत लहानुजी महाराज देवस्थानात २६ डिसेंबर ते १ जानेवारीपर्यंत संत लहानुजी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी ६ ते ८ सामुदायिक ध्यान, चिंतन आणि तमपून प्रभातफेरी निघेल. सकाळी ९ ते ११ संत लहानुजी महाराजांच्या चरित्राचे सामूहिक पारायण होईल. दुपारी १ ते ३ या वेळेत विविध महिला मंडळाचे भजन होईल. सायंकाळी ६ ते ७ सामूहिक ध्यान, प्रार्थना व आरती होईल. सायंकाळी ७ ते ९.४५ या वेळेत कीर्तन भजनाचे आयोजन केले आहे. २८ रोजी सकाळी ९ वाजता रक्तदान आणि आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे. यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगूळ उपस्थित राहणार आहेत. १ जानेवारी रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत कमलनयन कठाणे यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर कलश तीर्थ विसर्जन आणि काल्याचे वाटप होईल. नंतर पालखीची मिरवणूक गोपाळपुरा मार्गाने निघेल. सायंकाळी ६ वाजता महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

Powered by Bharat Web